# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:- शिष्यवृत्ती योजनांची सन २०२५-२६ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत**

संदर्भ : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य -२०२५-२६/डीबीटी/फी मंजुरी/ E-1997507

या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग यांनी पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२५-२६/डीबीटी/फी मंजुरी/ E-1997507 मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध विभागामार्फत राबवविण्यात येणाऱ्या राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरून एकत्रित ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

महाडीबीटी पार्टलवरून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालयाचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाविद्यालयाचे नाव, पत्ता, लिपीक व प्राचार्य यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक तसेच महाविद्यालयातील अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांचे शुल्क अद्ययावत करणे आवश्यक आहे. संदर्भिय महाआयटी कार्यालयाच्या इमेलनुसार, सन २०२५-२६ करिता महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय/संस्था यांना त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याची सुविधा दि. १७.०६.२०२५ पासून देण्यात आलेली आहे.

महाविद्यालयांनी/ संस्थांनी त्यांचे प्रोफाईलमध्ये भरलेल्या अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक/ शिक्षण शुल्क समिती/ शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूरी दिल्यानंतर त्यानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतात. त्यामुळे सदरची माहिती काळजीपूर्वक भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच शुल्क मुंजूरी देतानाही काळजीपूर्वक तपासणी करण्यात यावी.

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/१८८७
दिनांक : २६/०७/२०२५

( श्रीमती सुनिता हजारे )
उपकुलसचिव

सोबत:– शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांच्या दिनांक २२/०७/२०२५ रोजीच्या पत्राची प्रत.

**प्रत:**

१ मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
२ मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ

यांना विनंती की वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावा.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
Web-ww.dhepune.gov.in फोन नं.०२०/ २९७०७०९८ E-Mail : schol.dhepune@gov.in

क्र.उशिसं/शिष्य-२०२५-२६/डीबीटी /फी मंजुरी /E- 1997507 दि.

**तात्काळ ईमेलद्वारा**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- शिष्यवृत्ती योजनांची सन २०२५-२६ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र. १४६/मशि-२, दि. ०२.०८.२०१७.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७.
३. शासन निर्णय क्र. GAD-मातंस—२०१८/C.R.१३८/S.१/३९, दि. १२.१०.२०१८.
४. महाआयटी यांचा दि. १७.०६.२०२५ रोजीचा ई-मेल.

विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालयाचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाविद्यालयाचा नाव, पत्ता, लिपीक व प्राचार्य यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक तसेच महाविद्यालयातील अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांचे शुल्क अद्ययावत करणे आवश्यक आहे. संदर्भिय महाआयटी कार्यालयाच्या इमेलनुसार, **सन २०२५-२६ करीता महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांना त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याची सुविधा दि. १७.०६.२०२५ पासून देण्यात आलेली आहे.**

**महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचेसाठी सूचना :-**

१. महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांनी त्यांचे डीबीटी पोर्टलच्या युजर आय.डी. व पासवर्ड च्या आधारे लॉगीन करुन महाविद्यालयाचे प्रोफाईल अद्ययावत करावयाचे आहे.

२. महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीन मध्ये महाविद्यालयाची चालू अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत करणेची सुविधा देण्यात आलेली आहे. (उदा. महाविद्यालयात नवीन सुरु झालेला अभ्यासक्रम Add करणे.)

३. शासन / विद्यापीठ यांनी निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणेच महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रमाचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच शुल्क निश्चितीबाबतची कागदपत्रे पडताळणीसाठी डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.

४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी एकूण १६ प्रकारच्या इतर शुल्काच्या बाबींचा लाभ देण्यात येतो. तथापि महाडीबीटी पोर्टलवर इतर शुल्काच्या १० बाबींचा समावेश असल्यामुळे, महाविद्यालयांनी इतर शुल्काची माहिती पुढील तक्यामध्ये नमुद केल्यानुसार भरण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये शुल्कासाठी जबाबदार प्राधिकरणाकडून कोणतही बदल झाल्यास त्याप्रमाणे बदल करण्यात यावेत.

| Sr. No | महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध इतर शुल्क बाबी | महाविद्यालयांनी माहिती भरावयाच्या इतर शुल्कांच्या बाबी |
|---|---|---|
| १ | **Admission Fee** | Admission Fee |
| २ | Session Fee | Session Fee |
| ३ | **Laboratory Fee** | Laboratory fee |
| ४ | Semester Fee | Semester Fee |
| ५ | **Library Fee** | Library Fee |
| ६ | **Gymkhana Fee** | Gymkhana Fee |
| ७ | Study Tour | Study Tour |
| ८ | Enrollment Fee | Enrollment Fee |
| ९ | Project Fee | Project Fee |
| १० | **Other Fee** | १. College Magazine Fee |
| | | २. Computer Training Fee |
| | | ३. Extra Curriculum / Activity Fee |
| | | ४. Registration Charges |
| | | ५. Student ID charges |
| | | ६. University Development Fund |
| | | ७. University Sports Fund |
| | | ८. University Ashwamedh Fund |
| | | ९. University Medical Aid Fund |
| | | १०. University Students Assistance Welfare Fund |
| | | ११. University Student Insurance Fund |
| | | १२. Youth Festival Charges |

५. महाविद्यालयाने पोर्टलवर अद्ययावत केलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क या माहितीच्या आधारेच शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात येणार असल्यागुळे सदरची माहिती अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालयाचे लिपीकाचे लॉगीन मधून अद्ययावत करण्यात आलेले अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क याबाबतची माहिती केवळ पाहता येते, तथापि सदर माहितीमध्ये काही बदल हवा असल्यास प्राचार्य लॉगीन मधून बदल करता येईल.

७. महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबतची माहिती **दि. ०१.१२.२०२५ पर्यंत** भरुन त्यास संबंधित विभागीय सहसंचालक / सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

८. महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील शुल्काबाबतची माहिती भरतांना अभ्यासक्रमाचा जेवढा कालावधी असेल त्यापेक्षा दोन वर्ष अधिक कालावधीचे शुल्काबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे.
(उदा. B.A. अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षाचा असल्याने, सदर अभ्यासक्रमाची मागील ५ वर्षाची माहिती भरणे आवश्यक आहे.)

९. व्यावसायीक अभ्याक्रमाचे शुल्क (शिक्षण शास्त्र, शारीरिक शिक्षण शास्त्र, विधी अभ्यासक्रम) हे बॅच प्रमाणे भरणे आवश्यक आहे.

१०. महाविद्यालयांनी डीबीटी पोर्टलसंदर्भात येणाऱ्या अडचणींसाठी संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयाशी संपर्क साधावा व त्यांचेकडून आपल्या अडचणी त्वरीत सोडवून पुढील कार्यवाही करावी.

११. तसेच डीबीटी पोर्टल संदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या Grievance या लिंकच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यात याव्यात व त्या सोडविल्याची त्वरीत खात्री करुन घेण्यात यावी.

१२. महाविद्यालयांनी इन्स्टि्युट प्रोफाईल अद्ययावत करणेसाठी डीबीटी पोर्टलवर देण्यात आलेल्या व्हिडीओ व मॅन्युअल पाहून त्याप्रमाणे कार्यवाही केल्यास त्यांच्या अडचणी व शंकाचे निरसन होईल.

**विभागीय सहसंचालक / शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयासाठी सूचना :-**

१३. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व अकृषी विद्यापीठे तसेच महाविद्यालये / संस्था यांना त्यांचे इन्स्टि्युट प्रोफाईल बाबतची माहिती अद्ययावत करणेसाठी तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच माहिती भरणेसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

१४. महाविद्यालये / विद्यापीठ यांनी त्यांचे महाविद्यालयात चालू असलेल्या अभ्यासक्रम व त्यांचे शुल्क याबाबतची भरलेली माहिती संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच विनाअनुदानित शिक्षण शास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क हे मंजूरीसाठी सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती तसेच विनाअनुदानित विधी अभ्यासक्रमाचे शुल्क हे मंजूरीसाठी शुल्क नियामक प्राधिकरण यांचे लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१५. महाविद्यालयाने भरलेली अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबतची माहिती शासन / विद्यापीठ यांनी मान्यता दिल्यानुसारच नमुद केली असल्याबाबतची त्यांनी जोडलेल्या कागदपत्रांवरुन पडताळणी करावी.

१६. महाविद्यालय यांनी मंजूरीसाठी पाठविलेल्या अभ्यासक्रम / अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबत तात्काळ कार्यवाही (Approve / Reject) करणे आवश्यक आहे.

१७. महाविद्यालयांचे अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचे शुल्क याबाबतच्या माहितीची पडताळणी करणेसाठी विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

१८. महाविद्यालयाच्या अभ्यासक्रम व शुल्क याबाबतच्या माहितीस विभागाने मंजूरी दिल्यानंतर सदरची माहिती डीबीटी पोर्टलवर दर्शविण्यात येते. सदर माहितीमध्ये बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१९. तसेच, विभागाने मान्यता दिलेल्या शुल्कानुसारच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ देण्यात येणार आहेत त्यामुळे याबाबत आवश्यक ती दक्षता घेणे जरुरी आहे.

२०. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण तसेच सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती यांनी त्यांचे अधिनस्त असलेले विद्यापीठे / महाविद्यालयांपैकी प्रोफाईल अद्ययावत झालेल्या व प्रोफाईल अद्ययावत न झालेल्या महाविद्यालयांबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन सर्व महाविद्यालयांचे प्रोफाईल मुदतीमध्ये पूर्ण होईल याची खबरदारी घ्यावी.

महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी त्यांचे प्रोफाईलमध्ये भरलेल्या अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक / शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूरी दिल्यानंतर त्यानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतात. त्यामुळे सदरची माहिती काळजीपूर्वक भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच शुल्क मंजूरी देतानाही काळजीपूर्वक तपासणी करण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 22-07-2025 18:15:10

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.
२. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई.
३. मा.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.


# Re: Regarding commencement of new academic year 2025-26 in MahaDBT portal.

abhijit.deole@mahait.org | MON JUN 16 6:53 PM | 2 minute(s) read

Dear Sir / Mam,

In continuation with previous mail,

Institute Module i.e. Fee approval process for the new academic year A.Y. 2025-26 has commenced from 16th June 2025.




It is requested you to inform all fee approving authorities.

Also,**If there are any changes required in the Fee Approval workflow for the Academic Year 2025-26, it is requested that all concerned departments inform MahaIT at the earliest, so that the necessary modifications can be implemented in time.**

Regards
Abhijit Deole

On Thu, 5 Jun 2025 at 18:17, Abhijit Deole <abhijit.deole@mahait.org> wrote:

Dear Sir/Madam,

Regarding the minutes of the meeting held on 20th March 2024, w.r.t point no. 1 about starting the new academic year in June. Based on this discussion, MahaIT has provided a solution to initiate two academic years simultaneously under the MahaDBT portal. This feature is going to be launched from the new academic year, allowing us to run application acceptance of both academic years i.e new academic year 2025-26 and the previous academic year 2024-25.

Please refer to the main features of these changes:

1. Course Entry:

   Ø Students must fill in details for both the current course and the past course.
   Ø This is a mandatory step for all applicants.

2. Sequential Application Flow:

   Ø Students are required to first apply for the previous academic year (2024–25).

   Ø After this application, they become eligible to apply for the current academic year (2025–26).

   Ø Reapply option will be available for 2023-24 as well as 2024 -25.

3. Removal of Previous Allotment Restriction:

   Ø The prior system required approval of the earlier application before proceeding to the New Year application.

   Ø Now, students can simultaneously apply for both academic years without waiting for departmental approval of the previous year's form.

The Fee approval process for the new academic year 2025-26 will be commenced from 16th June 2025. Application acceptance for the new academic year 2025-26 will be commenced from 30th June 2025.

The application acceptance portal will be temporarily closed from **26th June 2025 at 6:00 PM** to **29th June 2025 at 11:59 PM**. This temporary closure is necessary to prepare for the commencement of application acceptance for the **academic year 2025–26** and implement the above mentioned changes as well as carry out portal feasibility checks.

Kindly revert in case of any query.

Regards

Abhijit Deole